स्वातंत्र्य सैनिकांना देण्यात येणाऱ्या सन्मानपत्राबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांकः-एसपीटी.१०८४/२६११/विक१. स्वासै,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६/८/१९८४.

वाचा :-१. शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. पीओएस. १०६६/एल,
दि. १२.८.६६.
२. शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. पीओएस. १२७०/एल१,
दि. १०.८.७०.
३. शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. पीओएस. १०६६/एल१,
दि. २५.९.७०.
४. शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. पीओएस. १२८३/भू. स्वा. सै. /
विक१. स्वासै, दि. ३.१२.८३.

शासन निर्णय :-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:-पीओएस. १०६६/एल १, दिनांक २५.९.७० नुसार स्वातंत्र्य सैनिकांच्या पश्चात खालील नमुद केलेल्या क्रमाने त्यांच्या वारसांना भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे सन्मानपत्र देण्याविषयी आदेश देण्यात आले होते :-

"स्वातंत्र्य सैनिकांची विधवा अथवा स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा अथवा स्वातंत्र्य सैनिकांच्या अज्ञान मुलांचे/मुलींचे पालक".

२. सहाव्या प्रवर्गातील भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणेच सन्मानपत्र देण्यात यावे व त्यावर खालील टीप असावी, असा निर्णय शासनाने घेतला होता :-

"सन्मानपत्रधारक केवळ शैक्षणिक सवलतीस पात्र आहे."

३. वरील टीप असण्यास सहाव्या प्रवर्गातील भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांनी आक्षेप घेतल्यामुळे त्यांना केवळ भूमिगत स्वातंत्र्य सैनिक म्हणून सन्मानपत्र देण्यात आले, उपर लिखित टिप असलेले सन्मानपत्र स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना देण्यात येत होते. या टिपेमुळे स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना इतर सवलती मिळण्यासाठी अर्ज करता येत नव्हता. त्यामुळे सदर टीप काढुन टाकण्यात यावी, अशी सर्वसाधारण मागणी स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसामार्फत शासनाकडे करण्यात येत होती. याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे कीं, वारसांना द्यावयाच्या सन्मानपत्रावर टीप नसावी व मृत्यु पावलेल्या नियमित स्वातंत्र्य सैनिकाच्या नांवापुढे "कैलासवासी [श्री] असे नमुद करुन त्यापुढे कंसामध्ये योग्य व पात्र वारसाचे नांव नमुद करावे. त्याचप्रमाणे ज्यांना टीप असलेले सन्मानपत्र दिले आहे त्यांच्याकडुन टीप असलेले सन्मानपत्र परत घेऊन वरीलप्रमाणे सन्मानपत्र देण्यात यावे.

..२..

या शासन निर्णयाव्दारे असाही आदेश देण्यात येत आहे की, सहा ज्या भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना दि. ३.१२.८३च्या शासन निर्णयानुसार गौरव पेन्शन मंजूर केली आहे त्यांना नियमित स्वातंत्र्य सैनिकांना देण्यात येणारे सन्मानपत्र देण्यात यावे. दि. ३.१२.८३च्या शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे पेन्शन व्यतिरिक्त पेन्शनधारक स्वातंत्र्य सैनिकांना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या इतर सवलती मिळू शकतील. मात्र त्यांच्याकडून त्यांना सहाव्या प्रवर्गातील भूमिगत स्वातंत्र्य सैनिकाचे सन्मानपत्र पूर्वी दिले असल्यास ते परत घेण्यात यावे. मात्र सहाव्या प्रवर्गातील ज्या भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शनसाठी पात्र ठरविण्यात आलेले नाही त्यांना सहाव्या प्रवर्गातील भूमिगत स्वातंत्र्य सैनिकाचे सन्मानपत्र पूर्वी दिले असल्यास ते परत घेऊ नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,

मुख्यमंत्री यांचे सचिव,

सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,

अध्यक्ष व इतर सदस्य, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १, मुंबई,

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य २, नागपूर,

सर्व मंत्रालयीन विभाग [आवश्यक कार्यवाहीसाठी],

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी/सर्व जिल्हा गौरव समित्या,

सर्व कोषागार अधिकारी,

अधिदान व लेखा अधिकारी,

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

वित्त विभाग, ईएसपी-४/वित्त विभाग, जीईएन-५ [५ प्रतींसह],

सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्रमांक २५,

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय [प्रसिद्धीसाठी],

निवड फाईल.